CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवे शहर ▢ मंगळवार, २० ऑगस्ट २०२४

खारघर-सीबीडी कोस्टल रोडला ग्रीन सिग्नल

खारघर ते सीबीडी दरम्यानच्या वाहतूक कोंडीतून होणार सुटका; परिसरातील घरांना मागणी

खारघर : खारघर ते सीबीडी ३० मीटर रुंदीच्या कोस्टल रोड उभारणीला भारत सरकारच्या 'पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय'ने परवानगी दिल्यामुळे ८ वर्षांपासून रखडलेल्या खारघर ते सीबीडी खाडीकिनारा कोस्टल रोडचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांची वाहतुकीतून सुटका होणार असून कळंबोली, कामोठे आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ गाठणे आता सोयीचे होणार आहे.

'सिडको'ने नवी मुंबई प्रकल्प उभारण्याचा संकल्प हाती घेताना तळोजा, कळंबोली आणि खारघरवासियांना नवी मुंबई विमानतळ विना अडथळा जाता यावे यासाठी 'सिडको'ने

केंद्र सरकारच्या 'पर्यावरण विभाग'कडून खारघर-सीबीडी बेलापूर कोस्टल रोडला मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पामुळे खारघर-बेलापूर-नेरुळ कोस्टल रोड सायन-पनवेल रोडचा नवीन दुवा आहे. शिवाय या रस्त्यामुळे खारघर-तळोजा येथील कॉर्पोरेट पार्क, 'सिडको'च्या गृहनिर्माण प्रकल्पात वास्तव्य करणाऱ्या नागरिक तसेच नवी मुंबई विमानतळ पर्यंत पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे.

-प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी-सिडको.

खारघर रेल्वे स्थानकाच्या मागे 'सिडको'कडून पंतप्रधान आवास योजनातून जवळपास २ हजाराहून अधिक घरे उभारली जात आहे. सदर प्रकल्प कोस्टल रोड आणि खारघर रेल्वे स्थानकाला लागून असल्यामुळे येथील घरांना अधिक मागणी असणार असून अनेकांचे या गृहनिर्माण प्रकल्पाकडे लक्ष लागले आहे.

खारघर ते सीबीडी

(उर्वरित पान २ वर)

खारघर-सीबीडी कोस्टल...

(पान १ वरुन)

खाडीकिनारा ६.९६ किलोमीटर लांबीच्या कोस्टल रोडसाठी २०१८ साली निविदा काढली काढून २७३ कोटीचे कंत्राट एका कंपनीला देण्यात आले होते. मात्र, सदर प्रकल्पाला पर्यावरण विभागाकडून परवानगीसाठी 'सिडको'कडून प्रयत्न सुरु होते. मात्र, त्याला यश मिळत नव्हते. अखेर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केंद्र सरकारच्या 'पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय'च्या 'तज्ञ मूल्यांकन समिती'ने कोस्टल रेग्युलेशन झोन नुसार खारघर ते सीबीडी-बेलापूर, सेक्टर-१५ दरम्यान उभारल्या जाणाऱ्या कोस्टल रोडच्या बांधकामाला परवानगी दिली दिल्यामुळे खारघर ते सीबीडी दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका होणार आहे.

कोस्टल रोडचे फायदे:

पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांना नवी मुंबई पामबीच आणि कोस्टल रोडने थेट खारघर टोल नाक्यावर पर्यंत विना अडथळा येता येणार आहे.

खारघर ते सीबीडी सेक्टर-१५ खाडीकिनारा अंदाजे ६.९६ किलोमीटर अंतराचा कोस्टल रोड आहे. तळोजा-खारघर मधील नागरिकांना सीबीडी, सेक्टर-११ मार्गे मार्गे नवी मुंबई विमानतळावर विना अडथळा जाता येणार आहे.

खारघर-सीबीडी दरम्यान होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

कोस्टल रोड मुळे खारघर कार्पोरेट पार्क, फुटबॉल स्टेडियमचा प्रवास सुखाचा होणार आहे.

खारघर टोल नाका दरम्यान सायन-पनवेल महामार्गावर पुल उभारुन रस्ता केला जाणारा असल्यामुळे भविष्यात खारघर सेक्टर-१५, १६ ते १८ येथील घरांना अधिक मागणी असणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

साप्ताहिक झुंजार मत | मंगळवार ता. २० ते २६ ऑगस्ट २०२४

सिडको पाणी पुरवठा विभाग ॲक्शन मोडवर खारघर मधील ३५ अनधिकृत बुस्टर पंप जप्त

सा. झुंजार मत वृत्तसेवा

पनवेल,(वार्ताहर) : खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जलवाहिनीवर बेकायदेशीरपणे लावलेले अनधिकृत बुस्टर पंप हटविण्याची मोहीम सिडको पाणी पुरवठा विभागाने सुरु केली असून, गेल्या आठवड्याभरात ३५ बुस्टर पंप जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, सिडको अखत्यारीतील तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी आदी नोड मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये अनधिकृतपणे लावण्यात आलेले बुस्टर पंप तात्काळ काढावे अन्यथा अनधिकृत बुस्टर पंप असलेल्या हौसिंग सोसायटींवर कारवाई केली जाईल, असा इशारा सिडको तर्फे देण्यात आला आहे. खारघर परिसरात नियमितपणे पाणी पुरवठा होत आहे. दरम्यान, १ ऑगस्ट पासून २० टक्के पाणी कपात सिडको पाणी पुरवठा विभागाने रद्द केली असूनही, काही सेक्टर मधील सोसायटींमध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी सिडकोकडे प्राप्त होताच सिडको पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी पाहणी केली असता खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप (मोटार) लावून पाणी घेत असल्याचे निदर्शनास येताच खारघर येथील काही सोसायटी मधील ३५ बुस्टर पंप सिडको'ने जप्त केले आहे. दरम्यान, तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी वसाहतीत सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप लावून पाणी घेत असल्यास बुस्टर पंप तात्काळ काढण्यात यावेत, असे आवाहन करतानाच बुस्टर पंपद्वारे पाणी घेणाऱ्या सोसायटींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल', अशी तंबी सिडको पाणी पुरवठा विभाग तर्फे देण्यात आली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवभारत मुंबई, मंगलवार 20 अगस्त 2024

सुविधा केंद्र सरकार के वन एवं पर्यावरण मंत्रालय से अनुमति मिलने से सिडको को राहत

खारघर-बेलापुर कोस्टल रोड का रास्ता साफ़

■ **नवी मुंबई** (सं). खारघर से बेलापुर सेक्टर 11 तक बनाए जाने वाले कोस्टल रोड के साथ-साथ नेरुल में जल यातायात शुरू करने के लिए बनाई गयी जेट्टी को केंद्र सरकार के वन एवं पर्यावरण मंत्रालय द्वारा हरी झंडी मिल गयी है. कहा जा रहा है कि अब खारघर से बेलापुर सेक्टर 11 तक बनाए जाने वाले कोस्टल रोड का रास्ता साफ़ हो गया है. केंद्र सरकार द्वारा हरी झंडी मिलने के बाद सिडको को बड़ी राहत मिली है. उल्लेखनीय है कि कोस्टल प्राधिकरण ने इस प्रस्ताव को अनुमति के लिए केंद्र सरकार के वन एवं पर्यावरण मंत्रालय के पास भेजा था, लेकिन केंद्र सरकार की समिति ने इस प्रस्ताव पर अनुमति देने से मना कर दिया था. इस समिति ने साफ़ शब्दों में कहा था कि यदि कोस्टल मार्ग को अनुमति दे दी जाती है तो बड़े पैमाने पर पर्यावरण को नुकसान होगा. इसलिए इस प्रस्ताव में इस बात को भी शामिल किया जाए कि पर्यावरण को होने वाले नुकसान की पूर्ति किस तरीके से की जाएगी ?

पक्षियों की 12 प्रजातियों का है निवास

उल्लेखनीय है कि इस कोस्टल रोड के लिए जो मार्ग बताया गया है, वह पर्यावरण की दृष्टिकोण से बेहद संवेदनशील है. इस कोस्टल मार्ग में 72 विभिन्न प्रजातियों के पक्षी निवास करते हैं. इन 72 प्रजातियों में 48 बाहर से आने वाले पक्षी तथा 24 देशी पक्षी शामिल हैं. इसके साथ ही इस क्षेत्र में बड़ी संख्या में फ्लेमिंगो पक्षियों का आवगमन इस परिसर में होता है. इन्हें कैसे बचाया जाएगा ? इन पक्षियों को कोई नुकसान न हो, इसका विलेष ध्यान रखने की बात कही गयी है.

205
करोड़ का खर्च बढ़ने के आसार

कोस्टल रोड बनने से जाम से मिलेगा छुटकारा

- खारघर से बेलापुर सेक्टर 11 तक कोस्टल रोड के बन जाने के बाद बड़ी संख्या में लोगों को यातायात जाम से छुटकारा मिल जाएगा.
- कोस्टल रोड के बनने के बाद नवी मुंबई में बन रहे हवाई अड्डे तथा अटल सेतु तक पहुंचने के लिए अच्छी कनेक्टिविटी मिल जाएगी.
- जिससे बड़े पैमाने पर लोगों को लाभ होगा और समय की बचत भी होगी.

8.22 हेक्टेयर खाड़ी जमीन होगी प्रभावित

सिडको ने इस मार्ग के निर्माण के लिए आदित्य एन्वायरमेंटल सर्विसेस से एक इम्पैक्ट असेसमेंट रिपोर्ट तैयार करवाई थी, जिसमें बताया गया था कि इस मार्ग के लिए खाड़ी की 8.22 हेक्टेयर जमीन सीधे तौर पर प्रभावित होगी और इसका असर 1182 मैंग्रोव्ज के पेड़ों पर पड़ेगा, जो पूरी तरह से परिपक्व हो चुके हैं. हालांकि सिडको द्वारा पुनर्रोपण करने की बात कही गयी है.